# छंदातून प्रोफेशनकडे

काही तरुणांनी छंद म्हणून, तर काहींनी पेट सीटिंगचा 'प्रोफेशनली' विचार केला आहे. पुण्याच्या 'पेट सीटर्स' संस्थेची शलाका मुंदडा त्यापैकीच एक. 'मला लहानपणापासूनच पेट्सची खूप आवड होती व त्यामुळे त्यांच्यासोबतच काम करावं, अशी इच्छादेखील होती.



साधारण ६ वर्षांपूर्वीपर्यंत पुण्यात प्राण्यांची काळजी घेणारी क्वालिटी केनेल नव्हती. या गरजेतूनच मी प्रॉपर ट्रेनिंग घेऊन 'पेट सीटर्स' सुरू केलं. शलाकानं मुंबईत यासंदर्भात ट्रेनिंग घेतलं, तसंच डॉग ट्रेनिंग अँड बिहेविअर या विषयीचा अभ्यासक्रम ब्रिटनमधून पूर्ण केला. माझा फोकस हा पेटच्या केनेलिंग आणि बोर्डिंगवर असतो त्यामुळे एखादा पेट माझ्याकडे कम्फर्टेबल राहणं गरजेचं असतं. हल्ली लोक स्वतःच्या मुलासारखी पेटची काळजी घेतात तसंच ट्रेनर-ट्रेनिंग-व्हेटर्निटी डॉक्टर-ग्रुमिंग सेशन्स या सगळ्याबाबत खूप कॉन्शिअस असतात. त्यामुळे मी पेट घेण्यापूर्वीच प्री-पेट काउन्सेलिंग तसंच पेट केनेलमध्ये राहायला येण्यापूर्वीच ट्रायल सेशन्स घेते याचा खूप फायदा होतो.

- **शलाका मुंदडा**, पेट सीटर्स (पुणे)

Loksatta.
Sep 14